माहितीचा
अधिकार

# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये**
**दाखल केलेली तक्रार**

## क्र.मुमाआ/नों.क्र.१५०९/ २२ / त.क्र.१४२ /२५/०१

श्री. रणजित राधानाथ घोरेय
रुम नं.१०५/०१, अण्णा नगर, डॉ.अे.बी. रोड,
वरळी, मुंबई – ४०००३०.

विरुद्ध

जन माहिती अधिकारी तथा वसाहत अधिकारी जी/दक्षिण विभाग
बृहन्मुंबई महानगरपालिका, सहाय्यक आयुक्त, जी/दक्षिण, विभाग
यांचे कार्यालय, ५ वा मजला, धनमिल कंपाऊंड,
एन.एम. जोशी मार्ग, परेल, मुंबई-४०००१३.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त जी/दक्षिण विभाग
बृहन्मुंबई महानगरपालिका, सहाय्यक आयुक्त, जी/दक्षिण, विभाग
यांचे कार्यालय, ५ वा मजला, धनमिल कंपाऊंड,
एन.एम. जोशी मार्ग, परेल, मुंबई-४०००१३.

**तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : १६.१२.२०२५**

| | | |
|---|---|---|
| तक्रारदार | : | अनुपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित (प्रतिनिधी) |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

सदर तक्रारीवर आज दि.१६.१२.२०२५ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली असून सुनावणी दरम्यान तक्रारदार व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. विद्यमान जन माहिती अधिकाऱ्यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सादर केलेल्या तक्रार अर्जात अपील क्रमांक ५२/२२ दिनांक १०/०२/२०२२ रोजी पारित केलेल्या आदेशाचे अनुपालन झाले नसल्याचा आक्षेप नोंदविला असला तरी तक्रारदार यांनी झोपडीच्या परिशिष्ट दोन मध्ये त्यांचे नाव समाविष्ट करून मिळावे अशा स्वरूपाची विनंती केलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणी वरील प्रकारची विनंती मान्य करणे किंवा त्यावर कुठलेही आदेश पारित करणे ही बाब अपेक्षित नसून केलेली मागणी माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कार्यकक्षेच्या बाहेरची असून अपिलार्थींचा मूळ जोडपत्र हा सन २०१८ साली अण्णा नगर एस.आर.ए. सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित यातील परिशिष्ट-दोन मध्ये नाव समाविष्ट करण्याबाबतचा असून आज झालेल्या सुनावणी दरम्यान संबंधित प्रकल्प हा पूर्ण झाल्याचे नमूद केले असल्याने प्रस्तुत प्रकरणी दिलेल्या आदेशाचे अंशतः अनुपालन झाले असल्याचे जन माहिती अधिकाऱ्यांनी सुचित केले असल्याने प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढून नस्तीबद्ध करण्यात येत आहे.

**आदेश**

**वरील तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission * Maharashtra *

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : १६.१२.२०२५**

**( राहुल भा. पांडे )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**